अमृता फॉर लाईफ मोहीम

# आरोग्यदायी गिलोय / गुळवेल

*Tinospora cordifolia* (Willd.) Hook. f. and Thoms.

समृद्ध जीवनासाठी गुळवेल मोहीम

### गुळवेल वनस्पती



### गुळवेल खोड



### गुळवेल रोपे



### गुळवेल उत्पादने



## औषधी उपयोग :

- सातही धातु व शरीराच्या सर्व अवयवांना बल देणारी ही प्रजाती त्रिदोष शमन करणारी आहे.
- जीर्ण व अनेक भयावह रोग आधुनिक चिकित्सेने बरे होत नाहीत. त्यासाठी गुळवेल उत्तम औषध आहे. ती रसायन म्हणून कार्य करते म्हणून ती 'रसायनी' नावानेही ओळखली जाते.
- गुळवेल पाने व खोड हे ताप, ॲलर्जी, वेदनाशामक, रोग प्रतिकारक, तसेच अँटीऑक्सिडंट्स (Antioxidant) म्हणून प्रभावीपणे काम करतात.
- गुळवेलच्या नियमित सेवनाने टाईप २ चा मधुमेह नियंत्रित करता येतो.
- ताप नियंत्रणासाठी गुळवेलीचा वापर सर्वपरिचित आहे. डेंग्यु चिकनगुनियातील तापामुळे रक्तपेशी कमी होतात, प्लेटलेट्स कमी होतात त्यासाठी गुळवेल फार प्रभावीपणे काम करते.
- नासिका शोथ आणि ॲलर्जीचा दमा बरे करणेची क्षमता या प्रजातीत आहे. हृदय व रक्तवाहीन्यांचे संरक्षण गुळवेलीने करतात. वातरक्तात गुळवेल सिध्द तुप किंवा तेलाबरोबर देतात.
- यकृताला असलेली सुज कमी करते.
- ताणतणाव कमी करण्यासाठी आणि बुध्यांक वाढण्यासाठी खोडाचा वापर केला जातो.
- वेदनादाहक, वातशामक, तापानंतर येणारा अशक्तपणा, भुक न लागणे, रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होणे इ. समस्यासांठी गुळवेल खोड वापरले जाते.
- गुळवेलीत पाचक, भुकवर्धक, डोळे विकार बरे करण्याचे गुणही आढळून येतात.
- अशक्तपणा किंवा शरीर दौर्बल्य आल्यास गुडूची सत्व वापरतात यामुळे हृदयाला बळ मिळते.
- दाह/ जळजळ कमी करण्यासाठी गुळवेल स्वरस देतात.
- कास किंवा खोकला यामध्ये गुडूची आणि कण्टकारी सिध्द तुपाबरोबर देतात.

## रोपे निर्मिती :

- रोपांची निर्मिती बिया किंवा खोडांच्या छाटांपासून केली जाते.
- लाल परिपक्व फळे गोळा करून कोमट पाण्यात २-३ तास ठेवून फळांचे आवरण काढून बियाणे सावलीत सुकवावे. पक्ष्यांनी खाल्लेले बियाणे चांगले रुजते.
- बियाणे ६-८ तास कोमट पाण्यात भिजवून पिशवीत पेरावे.
- रोपे लागवडी योग्य ३-४ महिन्यात तयार होतात.

## लागवड :

- हलक्या किंवा मध्यम निचरा होणाऱ्या जमिनीत लागवड करता येते.
- लागवड खड्डे खोदून मातीत शेणखत मिसळून, रोपाभोवती पाणी साठून राहणार नाही अशा पद्धतीने २ x २ मीटर अंतराने आधारवृक्षासह किंवा आधारासह करावी.

**गुळवेलाची आयुर्वेदिक उत्पादने**

गुडूची सत्व, चूर्ण, घनवटी, क्वाथ, तैल/घृत, अमृतारीष्ट

**गुळवेलीत आढळणारी औषधी रासायनिक द्रव्ये**

बरबेरीन, टीनोस्पोरीन, टीनोस्पेरिक ॲसिड, कॉर्डीओसाईड, टर्पिन्स, नैसर्गिक शर्करा इत्यादी

**गुळवेलीचे औषधी भाग**

खोड व पाने

**रोपे उपलब्धता, लागवड, उपयुक्तता, संवर्धन इत्यादी माहितीसाठी संपर्क**

प्रा. (डॉ.) दिगंबर मोकाट, प्रमुख संशोधक व विभागीय संचालक
पश्चिम विभागीय औषधी वनस्पती सह सुविधा केंद्र, (RCFC-WR)
(राष्ट्रीय औषधी वनस्पती मंडळ, आयुष मंत्रालय, भारत सरकार पुरस्कृत)
वनस्पतीशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११००७, महाराष्ट्र
ई-मेल : rcfc.wr.sppu@gmail.com / मो. ९०२१०८६१२५